<u>**पुढीलसरतपास वादीतर्फे श्री.के.व्ही.बेडंकुळे यांच्यामार्फत सुरु.**</u>

**१४.** माझी आई भागिरथीबाई हिने मला दावा चालविण्यासाठी अधिकारपत्र दिलेले आहे. त्यांना वयोमानपरत्वे हिंडता-फिरता येत नाही, तसेच नीटसे बोलता येत नाही. आता मला दाखविलेले अधिकारपत्र तेच आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आणि आईचा अंगठा आहे. तसेच, माझाही अंगठा आहे. त्यावर माझा व आईचा फोटो आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.क्र.६२ देण्यात आलेले आहे. आता मला नि.क्र.४/१ लगतचे संजय शिवपुजे यांच्या लाभातील खरेदीपत्राची सही शिक्क्याची नक्कल दाखवली. मी दाव्यासोबत कच्चे ले-आउट नकाशे दोन दाखल केलेले आहे. ते रस्त्याच्या उत्तरेकडचे आहेत. किनगाव पोलीस ठाण्यात दिलेला तक्रार अर्जाची प्रत आता मला दाखवली. त्यावर माझ्या आईचा अंगठा आहे. तसेच, माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास <u>**नि.क्र.७१**</u> देण्यात येते. सदर अर्ज मी टपालाने पाठविला होता. त्याची पोस्टाची पावती दाखल केलेली आहे. त्यास <u>**नि.क्र.७२**</u> देण्यात येते. नि.क्र.७१ प्रमाणे आणखी एक अर्ज मी पोलीस अधिक्षक, लातूर यांना दिला. त्याची तारीख ०५/१२/२०१५ आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझ्या आईचा अंगठा आहे. त्यास <u>**नि.क्र.७३**</u> देण्यात येते. तहसीलदार, अहमदपूर यांच्याकडे दि.१८/१२/२०१५ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाची आमच्याकडील प्रत मी हजर केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझ्या आईचा अंगठा आहे. त्यास <u>**नि.क्र.७४**</u> देण्यात येते. या अर्जाची एक प्रत तलाठी, किनगाव यांना दिली होती. माझा शाळा सोडल्याचा दाखला मी हजर केला आहे. मिळकत नं.३१०८/१७ या मिळकतीचा नमूना नं.८-अ उतारा दाखल केला आहे. त्यास <u>**नि.क्र.७५**</u> देण्यात येते. रुपाबाई गित्ते यांना माझ्या आईने करुन दिलेले खरेदीपत्राची सही शिक्क्याची नक्कल मी दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर साक्षीदार म्हणून माझी सही आहे. तसेच, रुपाबाई गित्ते व माझी आई यांचा सही

व अंगठा आहे. त्यास **<u>नि.क्र.७६</u>** देण्यात येते. नरहरी बालाजी फड यांना माझ्या आईने करुन दिलेले खरेदीपत्राची सही शिक्क्याची नक्कल मी दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर साक्षीदार म्हणून माझी सही आहे. तसेच, नरहरी फड व माझी आई यांचा सही व अंगठा आहे. त्यास **<u>नि.क्र.७७</u>** देण्यात येते. अंकुश कातळे यांना माझ्या आईने करुन दिलेले खरेदीपत्राची सही शिक्क्याची नक्कल मी दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर साक्षीदार म्हणून माझी सही आहे. तसेच, अंकुश कातळे व माझी आई यांचा सही व अंगठा आहे. त्यास **<u>नि.क्र.७८</u>** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>प्रतिवादी क्र.१ तर्फे श्री.आर.ई.भुरकापल्ले वकिल यांच्यामार्फत सुरु.</u>**

**१५.** हे खरे की, बापुराव बाजीराव शिरसाठ हे माझे मामा आहेत. बाबुराव दत्तात्रय चाटे हे आमच्या भावकीतील आहेत, हे खरे आहे. हे खरे की, बाबुराव चाटे हे किनगाव ग्रामपंचायतीची विद्यमान सदस्य आहेत. हे खरे की, मी संजय शिवपुजे, मंचक बोंडगे, लक्ष्मण येमले, नंदकुमार रोडे व राम शिंदे यांच्याविरुध्द फौजदारी खटला दाखल केला होता. हे खरे की, या खटल्यापुर्वी मी किनगांव पोलीस ठाणे व जिल्हा पोलीस अधिक्षक, लातूर यांच्याकडे त्यांच्याविरुध्द तक्रार केली होती. हे खरे की, पोलीस ठाणे व पोलीस अधिक्षक यांनी माझ्या तक्रारीची दखल घेतली नाही. हे खरे की, त्यानंतर मी वरील लोकांविरुध्द खाजगी फिर्याद दाखल केली. त्या प्रकरणी माझा जबाब पोलिसांनी नोंदविला. हे खरे की, त्या प्रकरणी सर्व आरोपींची दोष मुक्तता झालेली आहे. हे खरे की, त्या निकालाविरुध्द मी अपील केलेले नाही.

**( उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.)**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक:१७/११/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**